क्रमांकःपोअवा/आस्था/मअगु.-जि.स्त./तपास-पथक/ ५७६ /२०१८, वाशिम. दिनांक :- 19 JAN 2018

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकःपीएडब्लयु-०६१६/प्र.क्र.४९२/विशा ६, दिनांक १२/१०/२०१७.

२) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक(नाहसं व मअप्रवि), म.रा.,मुंबई यांचे ज्ञाप क्र.पोमसं/४२/मअप्रवि/विपोमनि./६(१३)/२०१७, दिनांक ०७/११/२०१७.

-०००००-

**आदेश :-**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये वाशिम जिल्हा पोलीस दलात स्वतंत्र महिला पोलीस तपास पथक स्थापन करण्यात येत आहे. सदरचे पथक हे पोलीस उपअधीक्षक, आर्थिक गुन्हे व पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखालील काम करेल.

| गट | पोनि/सपोनि/पोउनि | पोलीस हवालदार | पोलीस नाईक | पोलीस शिपाई |
|---|---|---|---|---|
| UNIT-१ | मसपोनि./ज्योती विल्लेकर | पोहवा./९०५, अतिष गजानन काळमुंदळे | मपोना./७३५, रेखा गुप्ता | १) मपोशि./७६२, संजीवणे कऱ्हाडे<br>२) मपोशि./१२००, संगिता ढोले |
| UNIT-२ | सपोनि./ प्रशांत कावरे | पोना./८५७, श्रीराम मिश्रा | मपोना./६५, पुष्पा राऊत | १) मपोशि./४६८, गोकुळा बोळके<br>२) मपोशि./१०९७, स्वाती बन्सी धुरजड |

वर नमुद सदर तपास पथकाचे कार्य पुढीलप्रमाणे असेल.

१. महिला व बालकांवरील गुन्ह्याच्या सद्यस्थिती संदर्भात आढाव घेणे व वेळेवर दोषारोपपत्र पाठविण्यासंदर्भात पाठपुरावा करणे.
२. अपराधसिध्दता वाढविण्यासाठी उपाययोजना करणे.
३. केंद्र व राज्य शासनाने महिलांवरील अंमलबजावणी अत्याचार/गुन्हे या संदर्भात पारित केलेल्या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यवाही करणे.
४. महिलांवरील अत्याचारांबाबत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांच्या तपास त्वरित करण्याच्या दृष्टीकोनातून संबंधीतांना प्रशिक्षण देणे.
५. महिलांच्या संरक्षणासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना सुचविणे.
६. महिलांच्या संरक्षणासंदर्भात जागरुकता वाढविण्याच्या दृष्टीने कार्यशाळा, चर्चासत्र व विशेष मोहिम राबविणे.
७. महिलांच्या संरक्षणासंदर्भात कार्यरत असलेल्या स्वंयसेवी संस्थांशी समन्वय साधून त्यांना सहकार्य व मार्गदर्शनि करणे.

८. महिलांवरील अत्याचार, गुन्हे/घटनासंदर्भात पोलीस महासंचालक यांनी घटक प्रमुखांना दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने अंमलबजावणी करुन घेणे आणि आढावा अहवाल पोलीस महासंचालक, यांना सादर करावा.

९. घटक प्रमुख विर्निदिष्ट करतील अशा महिलांवरील अत्याचाराबाबत दाखल होणाऱ्या गंभीर गुन्ह्यांचा तपास करणे.

सदर शाखा दोन गटांमध्ये कार्यरत राहील. प्रत्येक गटांचे प्रमुख हे पोलीस निरीक्षक / सहायक पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी असतील. या दोन्हीही गटांवर आमच्या नंतर पोलीस उपअधिक्षक (आर्थिक गुन्हे) यांचे नियंत्रण राहील. वरीलप्रमाणे स्थापन केलेल्या गटांचे कार्य खालीलप्रमाणे राहील.

| गट | कार्यक्षेत्र |
|---|---|
| गट १<br>UNIT-१ | बलात्कार, अपहरण, विनंयभंगाचे प्रकार (Outraging Modesty) आणि महिलांवरील इतर गंभीर गुन्हे. |
| गट २<br>UNIT-२ | हुंडाबळी, हुंडयाशी संबंधीत आत्महत्या आणि हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत उध्दभवणारे इतर गुन्हे, भारतीय दंड सहितेच्या कलम ४९८(अ) अंतर्गत गुन्हे तसेच कौटूंबिक हिसाचार व हुंडयाशी निगडीत इतर गुन्हे. |

**( मोक्षदा पाटील )**
पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

पोलीस उपअधीक्षक(आर्थिक गुन्हे शाखा), वाशिम / मसपोनि.ज्योती विल्लेकर / सपोनि.प्रशांत कावरे / सपोनि., महिला तक्रार निवारण कक्ष, वाशिम.

२/- संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांनी सदरचे आदेश प्राप्त होताच पोलीस उपअधीक्षक(आर्थिक गुन्हे शाखा, वाशिम यांचे कडे त्वरीत हजर होवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली कर्तव्य पार पाडावे.

प्रत माहितीस :-

अपर पोलीस अधीक्षक, वाशिम/ उपविभागीय पोलीस अधीकारी, वाशिम/मंगरुळपीर/ कारंजा/ पोलीस उपअधिक्षक(मुख्या.), वाशिम/सर्व ठाणेदार/ सर्व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा / रापोनि.,पो.मु.,वाशिम/संगणक कक्ष/डिपीजी लिपीक पो.अ., कार्यालय, वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपीक लेखाशाखा/पत्रव्यवहार शाखा, वाशिम/पशा-१/प्रबंधक/मोपवि., वाशिम.

२/- प्रबंधक / मोपवि., यांनी सदर शाखेसाठी लागणारी साधनसामुग्री / उपकरणे, फर्निचर, वाहन इ. सुविधासाठी मंजूर असणाऱ्या अनुदानातून त्वरीत उपलब्ध करुन देण्यात यावीत.